अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१३.०३.२०२५

# प्रेस नोट

**अमित दिलिप सुलक्षणे, वय ३५ वर्ष, सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.चोपडा शहर कक्ष–२,ह.मु.प्लॉट नं.६०, बारोले नगर–१,चोपडा,मुळ रा.प्लॉट नं.१०, रायसोनी नगर, जळगाव (खाते विज वितरण विभाग वर्ग २) यांना ४,५००/–रु. लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने रंगेहात पकडले.**

---०००००००---

तक्रारदार यांचे मयत वडीलांचे नावे असलेल्या विज मिटरमध्ये फेरफार केल्याचे कारणावरुन यातील आलोसे यांनी सदरचे विज मिटर काढुन नेवुन तक्रारदार यांना २१,२८०/–रूपये दंड व ४,०००/–रुपये कपाउंडीग चार्जेस भरण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे घराशेजारी राहणारे कृष्णा नारायण जाधव यांचे फोन पे वरुन २१,२८०/–रूपये दंड भरुन स्वत: ४,०००/–रुपये कपाउंडीग चार्जेस भरुन, आलोसे यांना नविन विज मिटर बसवुन देण्यास सांगीतले असता सदरचे काम करुन देण्यासाठी त्यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम ५,५००/– रुपयांची लाचमागणी केले बाबत तक्रारदार यांची सविस्तर तक्रार लिहुन घेण्यात आली होती.

सदर लाचमागणी तक्रारीची दि.११.०३.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांचे घरी नविन विज मिटर बसवुन देण्याकरिता प्रथम ५,५००/– रुपये व तडजोडीअंती ४,५००/–रुपये लाचेची मागणी करुन, तक्रारदार यांना मयुर पाटील यास भेटुन ऑनलाईन फॉर्म भरण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी मयुर पाटील यास फोन करुन नविन विज मिटर घेण्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरायचा आहे असे सांगीतले असता त्याने मी बाहेर आहे तु विधी ऑनलाईन सेंटर वरुन फॉर्म भरुन घे असे सांगीतले होते. त्याप्रमाणे तक्रारदार याने सदर ठिकाणी जावुन नविन विज मिटर घेण्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरुन, आलोसे यांचे कार्यालयात जावुन कागदपत्र आणले असल्याचे सांगुन विज मिटर बसवुन देण्यास सांगीतले. त्या दरम्यान आलोसे यांनी पुन्हा तक्रारदार यांना विज मिटर बसवुन देण्यासाठी ४,५००/–रुपये रुपयांची मागणी करुन पैसे घेवुन येण्यास सांगीतले. परंतु तक्रारदार यांचेकडे पैसे नसल्याने सदर दिवशी सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली होती.

त्यानंतर दि.१२.०३.२०२५ रोजी झालेल्या यशस्वी सापळा कारवाई दरम्यान १७.४५ वाजेचे सुमारास महावितरण कार्यालय,चोपडा येथे वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांचे घरी नविन विज मिटर बसवुन देण्याकरिता तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती ४,५००/– रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारुन त्यांचे पॅन्टचे मागील बाजुच्या उजव्या खिश्यात ठेवुन घेतली म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**टिप :– सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकिय नोकराने त्यांचे शासकिय काम करुन देण्यासाठी शासकिय फी व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**<br><br>**अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगांव** |
| **दुरध्वनी कमांक** | **०२५७–२२३५४७७** |
| **मोबाईल कमांक** | **९७०२४३३१३१** |
| **टोल फ्री कमांक** | **१०६४** |

(पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव — शिक्का)

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव